# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:15.11.2025** **वार:शनिवार**

---

1. बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत
2. बिहारची विकासयात्रा आता थांबणार नाही - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही
3. आदिवासी नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंती निमित्त देशभरात त्यांना आदरांजली
4. जेष्ठ शिल्पकार राम सुतार यांना 2024 यावर्षीचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्रदान आणि
5. कोलकाता क्रिकेट कसोटीमध्ये भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव 159 धावात गुंडाळला

**बिहार निवडणूक निकाल**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. विधानसभेच्या 243 जागांपैकी 202 जागांवर रालोआचे उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे 89 आणि संयुक्त जनता दलाचे 85 उमेदवार निवडून आले असून, लोक जनशक्ती पक्षाला 19 जागांवर विजय मिळाला आहे. विरोधी आघाडीतल्या राष्ट्रीय जनता दलाला केवळ 25 जागाच जिंकता आल्या तर काँग्रेस पक्षाला 6 जागांवर विजय मिळवता आला.

बिहारची विकास यात्रा आता थांबणार नाही अशी ग्वाही देत बिहारमधल्या यशाचा आनंद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. बिहार विधानसभा निवडणुकीतल्या विजयानंतर काल पंतप्रधानांनी नवी दिल्लीत पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. बिहार निवडणुकीचा विजय हा बिहारमधल्या महिलांचा विजय आहे असं ते म्हणाले.

बिहारमधला विजय म्हणजे विकास केंद्रित आणि लोक कल्याणकारी योजनांवर जनतेनं दाखवलेला विश्वास असल्याचं भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. तर बिहारमधलं प्रत्येक मत हे भारताच्या सुरक्षिततेशी तडजोड करणाऱ्यांना जनतेनं दिलेलं उत्तर आहे अशी प्रतिक्रिया केंद्रिय गृह मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली.

दरम्यान, या निवडणुकीतल्या पराभवाचं आम्ही विश्लेषण करू आणि लोकशाही वाचवण्याचा प्रयत्न करू असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**पोट निवडणूक**

देशात 7 राज्यांमधल्या 8 विधानसभा मतदारसंघांमधे झालेल्या पोटनिवडणुकीत जम्मू कश्मीरमधल्या नागरोटा मतदारसंघात भाजपाच्या देवयानी राणा, तर बडगाममधे जम्मू काश्मीर पीपल्स डेमॉक्रेटिक पार्टीचे आगा सईद मुन्तजिर मेहदी विजयी झाले आहेत. काँग्रेसचे उमेदवार तेलंगणात ज्युबिली हिल्स आणि राजस्थान मधल्या अंता मतदारसंघात विजयी झाले आहेत. मिझोरममधे दाम्पा इथं मिझो नॅशनल फ्रंटचे डॉ. आर लाल थंगलियाना, तर पंजाबच्या तरणतारण मतदारसंघात आम आदमी पार्टीचे हरमीत सिंग संधू निवडून आले. झारखंडच्या घाटसिलामध्ये, झारखंड मुक्ति मोर्चा उमेदवार सोमेश चंद्र सोरेन विजयी झाले.

**पंतप्रधान-गुजरात दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात, ते मुंबई-अहमदाबाद जलदगती रेल्वे महामार्गाच्या प्रगतीचा आढावा घेणार असून, सूरत मधल्या निर्माणाधिन बुलेट ट्रेन स्थानकाला भेट देणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान नर्मदा जिल्ह्यातल्या देवमोगरा मंदिरात पूजा आणि दर्शन घेऊन देदियापाडा इथं धर्ती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. या वेळी, त्यांच्या हस्ते 9 हजार 700 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध पायाभूत सुविधा

आणि विकास प्रकल्पांचं उद्घाटन होणार आहे. आदिवासी न्याय महाअभियान आणि धर्ती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत बांधलेल्या एक लाख गृह प्रवेशाच्या कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होतील.

**जनजातीय गौरव दिवस**

आदिवासी नेते आणि स्वातंत्र्ययोद्धे भगवान बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस आज देशभरात जनजातीय गौरव दिवस म्हणून साजरा केला जात आहे. आदिवासी स्वातंत्र्य सैनिकांचा गौरव सांगणारी संग्रहालयं आणि स्मारकं उभारण्यावर सरकारनं नेहमीच भर दिला आहे. या अंतर्गत दहा राज्यांमध्ये अकरा संग्रहालयं उभारण्याचा प्रस्ताव सरकारनं मंजूर केला असून यातील तीन संग्रहालयांचं उद्घाटन झालं आहे. आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांची कहाणी सांगणारी आदी शौर्य इ बुक्स, आणि अमर चित्रकथा ही कथामालिका प्रकाशित करण्यात आली आहेत.

**महाराष्ट्र भूषण**

विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी घडवलेली शिल्पं इतिहासाची साक्षीदार असून त्यातून अभिव्यक्त होणारा वारसा शेकडो वर्ष अबाधित राहील अशा शब्दांत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राम सुतार यांचा गौरव केला. सुतार यांना महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. उत्तर प्रदेशात नोएडा इथं सुतार यांच्या निवासस्थानी झालेल्या या अनौपचारिक कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.राम सुतार यांनी आपल्या शिल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशाचा नावलौकिक जगभरात वाढवला आहे.त्यांच्यामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्काराची उंची वाढली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**भारत-इयू संवाद**

स्थलांतर आणि संबंधित सुविधा याबाबत भारत आणि युरोपिय संघामध्ये झालेल्या समान धोरण कराराची अंमलबजावणी समाधानकारक असल्याचं भारत तसंच युरोपिय संघानं म्हटलं आहे. भारत युरोपिय संघ उच्चस्तरीय बैठकीत याबाबत चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं. युरोपमधल्या कायदेशीर स्थलांतरासाठी भारतात एक कार्यालय सुरू करण्यावर यावेळी चर्चा झाली. व्यावसायिकांना युरोपमध्ये जाण्यास मदत करण्यासाठी एकात्मिक केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव या बैठकीत भारतानं सादर केला. माहिती आणि दूरसंवाद क्षेत्रातील तंत्रज्ञांपासून याची सुरुवात केली जाईल.

**गंगटोक अंतर्राष्ट्रीय पर्यटनमार्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे पूर्वोत्तर भागात पर्यटनामध्ये लक्षणीय वाढ झाली असल्याचं प्रतिपादन आसामचे पर्यटन मंत्री रंजीत कुमार दास यांनी केलं. गंगटोक जिल्ह्यातल्या पांगथांग मध्ये पूर्वोत्तर भागांसाठी 13 व्या आंतरराष्ट्रीय पर्यटन मार्टचं आयोजन करण्यात आलं आहे. त्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. केंद्रीय पर्यटन मंत्रालय आणि सिक्किम सरकारच्या पर्यटन आणि नागरी उडाण विभागाच्या सहकार्यानं उद्यापर्यंत हा उपक्रम सुरू राहणार आहे. यावेळी अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, पर्यटन मंत्री पासंग दोरजी सोना, यांच्यासह पर्यटन मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ऑस्ट्रेलिया, जर्मनी, इटली, फ्रांस सह 19 देशांचे 39 आंतरराष्ट्रीय पर्यटन भागधारक सहभागी झाले आहेत.

**दिव्यकला मेळा**

केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीनं लखनऊ विद्यापीठात दिव्य कलामेळयाचं आयोजन करण्यात आलं आहे. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्य मंत्री बनवारी लाल वर्मा यांच्या हस्ते 9 दिवस चालणाऱ्या या मेळयाचं आज उद्घाटन होणार आहे. या मेळयात 18 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधले सुमारे 100 दिव्यांग कारागीर, कलाकार आणि उद्योजक आपली उत्पादनं आणि आणि कौशल्य सादर करणार आहे.

**भूकंप-तिबेट**

तिबेटमध्ये काल संध्याकाळी 4 पूर्णांक 1 रिख्टर क्षमतेच्या भूकंपाची नोंद झाली. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या माहितीनुसार वाजता भारतीय वेळेनुसार संध्याकाळी 6 वाजून 47 मिनिटांनी झाला. भूकंपची खोली 60 किलोमीटर होती. यापूर्वी, 11 नोव्हेंबरला तिबेटमध्ये 3 पूर्णांक 8 क्षमतेचा भूकंप झाला होता.

**<u>इंडोनेशिया भूस्खलन</u>**

इंडोनेशियामध्ये, देशाच्या मध्य जावा प्रांतात काल झालेल्या भूस्खलनात दोन लोकांचा मृत्यू झाला असून 21 जण बेपत्ता आहेत. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या प्रवक्त्या अब्दुल मुहारी यांनी सांगितले की 23 लोकांना वाचवण्यात आलं असून, बचाव यंत्रणा खचलेल्या भागांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र खचलेल्या जमीनीमुळे मदत कार्यात अडथळा येत आहे.

**<u>कामिनी कौशल-निधन</u>**

प्रख्यात अभिनेत्री कामिनी कौशल यांचं काल मुंबईत, वृद्धापकाळानं निधन झालं त्या 98 वर्षांच्या होत्या. नीचा नगर या 1946 मध्ये आलेल्या चित्रपटातून कौशल यांनी अभिनयाच्या कारकिर्दीला सुरुवात केली, सत्तर वर्षे त्यांनी विविधांगी भूमिकांद्वारे अभिनय क्षेत्रात आपला ठसा उमटवला. वयाच्या 95 व्या वर्षी अभिनय केलेला लाल सिंह चड्ढा हा त्यांच्या कारकिर्दीतला शेवटचा चित्रपट ठरला.

**<u>नेमबाजी</u>**

इजिप्तमध्ये सुरू असलेल्या नेमबाजीच्या आयएसएसएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या इशा सिंग हिला महिलांच्या 25 मीटर पिस्तूल प्रकारात कांस्य पदक मिळालं. तीन सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्य पदकांसह भारत पदक तालिकेत तिसऱ्या क्रमांकावर आहे.

**<u>तीरंदाजी</u>**

ढाका इथल्या आशियाई अजिंक्यपद तीरंदाजी स्पर्धेत रिकर्व्ह प्रकारात भारताला दोन वैयक्तिक सुवर्ण पदकं मिळाली आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

कोलकाता इथं इडन गार्डन मैदानावर कालपासून सुरु झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव 159 धावात गुंडाळला. पाहुण्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. काल खेळ थांबला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात एक बाद 37 धावा झाल्या होत्या. यशस्वी जयस्वाल 12 धावांवर बाद झाला तर के एल राहुल 13 आणि वॉशिंग्टन सुंदर सहा धावांवर खेळत आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार